# ऑनलाइन अर्ज सादर करणे संदर्भात उमेदवारांना सूचना

1. आय टी आय उमेदवारांनी (शालांत परीक्षा उत्तीर्ण उमेदवार वगळता) बेस्ट उपक्रमाकडे अर्ज करण्या पूर्वी प्रथम **कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या** "www.apprenticeshipindia.gov.in" या संकेत स्थळावर (Apprentices-Candidate Registration) विकल्पा अंतर्गत यशस्वीरीत्या नोंदणी करणे आवश्यक आहे. या नोंदणी पश्चात उमेदवारास "A" या आद्याक्षराने सुरू होणारा एक प्रशिक्षणार्थी नोंदणी क्रमांक मिळेल. बेस्ट उपक्रमाकडे सादर करावयाच्या ऑनलाइन अर्जात हा नोंदणी क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे. उमेदवारास बेस्ट उपक्रमाकडे अर्ज करण्या आधी उपरोक्त संकेत स्थळावरील नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे देखील गरजेचे आहे. (**शालांत परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांकडून ही प्रक्रिया त्यांच्या बेस्ट उपक्रमातील निवडी नंतर पूर्ण करून घेतली जाईल**)

2. बेस्ट उपक्रमात ऑन लाइन नोंदणी साठी मुख्य पृष्ठावरील "उमेदवार लॉग इन" या विकल्पा अंतर्गत उमेदवाराने प्रथम आधार कार्ड क्रमांक टाकून नंतर स्क्रीन वर दर्शवल्या प्रमाणे त्याने आपला सोईस्कर पासवर्ड बनवायचा आहे. त्या नंतर आपला इ मेल आय डी व मोबाईल क्र. टाइप करायचा आहे. ( **आपण दिलेला ई मेल आय डी/ मोबाईल क्रमांक प्रशिक्षण चालू असेपर्यंत बदलू नये**') तदनंतर ज्या शाखेसाठी अर्ज करावयाचा आहे ती शाखा जसे की "एस.एस.सी.", "आय.टी.आय" अथवा "एम.सी.व्ही.सी" शाखा निवडून आणि कॅपच्या लेटर्स टाकून "जनरेट ओटीपी" वर क्लिक करायचे आहे. ई मेल वर आलेला ओटीपी व मोबाईल वर आलेला ओटीपी सत्यापित (Verify) करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. उमेदवाराला मॉनिटरच्या स्क्रीन वर त्याने केलेली नोंदणी प्रक्रिया यशस्वी रित्या पूर्ण झाल्याचा मेसेज येईल.

3. उमेदवाराला त्या नंतर "लॉग इन"चा स्क्रीन दिसेल. उमेदवाराने या नोंदणी नंतर निर्माण झालेला अर्ज क्रमांक हाच यूजर आय डी म्हणून वापरायचा आहे. (अर्ज क्रमांक विसरल्यास उमेदवार आधार कार्ड क्रमांकाने देखील लॉग इन करू शकतात) उमेदवाराने तेथे आपला यूजर आय डी अर्थात नोंदणी नंतर निर्माण झालेला अर्जाचा क्रमांक टाकावा व नंतर आपला पासवर्ड टाकावा.

4. उमेदवारासमोर आता अर्जाचा नमूना दिसू लागेल. आपली संपूर्ण माहिती आता या ठिकाणी भरायची आहे तसेच निळा पार्श्वभाग असलेले 10 ते 50 kb पर्यंतचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) अपलोड करावयाचे आहे. ही माहिती भरताना उमेदवाराने एकही रकाना रिकामा राहणार नाही याची काळजी घ्यावी तसेच माहिती लक्षपूर्वक रित्या भरावी, प्रत्येक विषयात मिळालेले गुण आणि किती पैकी या कडे विशेष लक्षं द्यावे.

5. अर्ज संपूर्णतया भरल्या नंतर, सर्व माहिती बरोबर व पूर्ण भरली आहे याची पडताळणी करून मगच अर्ज सादर करण्या करता "सबमिट" या बटनावर क्लिक करावे. उमेदवाराने, सादर केलेल्या "अर्जाची प्रत (Application form)" आणि " तथा प्रवेश पत्रिकेची (Acknowledgement cum Gate Pass)" प्रिंट न विसरता घ्यावी. फॉर्मची छपाई करण्यापुर्वी नमूद केलेली माहिती बरोबर आहे याची उमेदवाराने खात्री करून घ्यावी, नंतर अर्जात कोणत्याही प्रकारचा बदल स्वीकारला जाणार नाही.

6. उमेदवाराने ऑनलाइन प्रक्रियेद्वारे सादर केलेल्या अर्जा संदर्भात पुढील सूचना उपरोक्त संकेत स्थळावर प्रसारित केल्या जातील. त्याच प्रमाणे त्यांना ईमेल द्वारे तसेच एस.एम.एस. द्वारे सूचना प्राप्त होतील.

# उमेदवाराने ऑनलाइन अर्ज सादर केल्या नंतर करावयाच्या बाबी

1. उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ दस्तऐवज त्यांच्या झेरॉक्स प्रतींसह, अर्जाच्या प्रिंट आऊट सह तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा येथे मुलाखतीच्या वेळी जमा करावेत. मुलाखतीचा कार्यक्रम संकेत स्थळावर "निकाल/Result" विकल्पांतर्गत प्रसिद्ध केला जाईल तसेच उमेदवाराला इ मेल द्वारे व्यक्तिश: देखील कळविला जाईल. या करता उमेदवाराने केवळ स्वत:चा अचूक इ मेल देणे आवश्यक आहे तसेच वेळो वेळी आपला इ मेल तपासणे देखील आवश्यक आहे.

2. तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा मधील कर्मचारी, मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराने भरलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंट व मूळ दस्त ऐवज यांची काळजी पूर्वक छाननी करून तपासणी करतील व झेरॉक्स प्रतींचा एक सेट जमा करून घेतील. तपासणी नंतर अर्जाचे निश्चितीकरण करून उमेदवारास पोचपावतीवर (पोचपावती-तथा-प्रवेशपत्रिका) प्रमाणित करून देण्यात देईल.

3. सर्व पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी व प्रतीक्षा यादी विहित वेळा पत्रकानुसार, उमेदवाराने अर्ज सादर केलेल्या संकेत स्थळावरील मुख्य पृष्ठावरील **"निकाल/Result"** या विकल्पा अंतर्गत ऑनलाइन पद्धतीने प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच मुलाखतीचा कार्यक्रम देखील अपलोड केला जाईल व उमेदवाराला त्याच्या ई मेल वर देखील कळवला जाईल.

4. जर एखादा उमेदवार प्रवेशा करिता दिलेल्या मुदतीमध्ये (तारीख व वेळ) तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा येथे हजर राहिला नाही तर अशा उमेदवाराचा, त्याची निवड झालेल्या जागेवरील प्रवेशाचा दावा रद्द होईल. काही अपरिहार्य कारणामुळे त्यास दिलेल्या तारखेस व वेळेवर उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्याने तसे व्यक्तिश: आगाऊ कळविणे आवश्यक आहे. (योग्य त्या कारणासह)

5. अशा प्रकारे रिक्त राहिलेल्या जागी प्रतीक्षा यादी वरील उमेदवारांचा विचार केला जाईल.

6. निवड झालेल्या उमेदवाराने व्यक्तिश: हजर राहून निवड प्रक्रिया फेरीमध्ये विशद केलेल्या वेळा पत्रका प्रमाणे निवडीची प्रक्रिया पूर्ण करावी.

7. मुलाखतीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवाराची वैदकीय चाचणी घेतली जाईल व त्यात पात्र ठरल्यावर अंतिम निवड होईल.

8. निवडीच्या अंतिम दिनांका पर्यन्त निवडीची सर्व प्रक्रिया पूर्ण करणे उमेदवारावर बंधन कारक राहील.

9. एखाद्या उमेदवाराची निवड केल्या नंतर त्यांचा शाळा सोडल्याच्या मूळ दाखला व माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (एसएससी, आयटीआय अथवा एचएससी एमसीव्हीसी, जे लागू असेल ते) परीक्षेचे मूळ गुण पत्रक तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा येथे जमा करून घेण्यात येईल व जो पर्यन्त उमेदवार निवड रद्द करत नाही वा प्रशिक्षण पूर्ण करत नाही तो पर्यन्त ही मूळ प्रमाण पत्रे निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना परत करण्यात येणार नाहीत.

**THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY AND TRANSPORT UNDERTAKING**

**(OF THE BRIHAN MUMBAI MAHANAGARPALIKA)**

**Recruitment of trade apprentices in various trades in the BEST Undertaking under the Apprentices Act 1961**

↓

**https://www.bestundertaking.com**

↓

**RECUITMENTS**

↓

**APPOINTMENT OF TRADE APPRNTICE UNDER APPRNTICES ACT 1961, IN BEST UNDERTAKING**

**(New page will open)**

↓

**APPLICATION**

↓

**SIGN UP WITH AADHAR CARD, CREATE PASSWORD AND SELECT STREAM (SSC, MCVC, ITI)**

↓

**TYPE EMAIL ID AND MOBILE NO. SUBMIT CAPTCHA AND GENERATE OTP**

↓

**VERIFY OTP AND SUBMIT THEN YOU WILL RECEIVE APPLICATION NO.**

↓

**LOG IN WITH APPLICATION NO/ AADHAR NO**

↓

**FILL APPLICATION FORM AND UPLOAD PHOTO AND RELEVANT DOCUMENTS AND SUBMIT THE FORM.**

↓

**TAKE PRINT OF APPLICATION AND Acknowledgement cum Gate Pass**